अनुसूचित जाती- जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी : एक प्रशासकीय अभ्यास

(विशेष संदर्भ हिंगोली व वाशिम जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या मानव्यविद्याशाखे अंतर्गत लोकप्रशासन विषयातील विद्यावाचस्पती (Ph. D.) पदवी करिता सादर करण्यात आलेला संशोधन आराखडा

संशोधक

सिद्धार्थ दत्ता गोवंदे

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. श्यामसुंदरपंढरीनाथ वाघमारे

प्राध्यापक तथा लोकप्रशासन विभाग प्रमुख

शारदा महाविद्यालय परभणी

मार्च 2022

प्रस्तावना (Introduction)

भारताच्या संविधानाने सर्वांना सन्मानाने जगण्याचा हक्क दिलेला आहे. घटनेतील कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहेपरंतु आजही दलित आणि आदिवासी यांच्या हक्कांचे वारंवार उल्लंघन करण्यात येते. त्यांच्यावर अत्याचार करण्यात येतात. या गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी 'अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट' १९८९ मध्ये पारित करण्यात आला. मात्र, त्याचाही फारसा परिणाम होत नसल्याचे आढळल्याने त्यात सुधारणा करण्यात आली आणि ती १ जानेवारी २०१६ पासूनती सुधारणा अमंलात आली.

दलित आणि सवर्ण अशा दोघांनीही हा कायदा अभ्यासणे आवश्यक आहे. त्याचा योग्यरीत्या वापर करण्यात आला पाहिजे. ज्या दिवशी सवर्ण हे दलित व आदिवासी यांना संरक्षण देण्यास सुरुवात करतील त्या दिवसापासून या कायद्याची आवश्यकता राहणार नाही.सुधारित कायद्यामध्ये फार चांगल्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. अन्यायग्रस्त, पीडित व साक्षीदारांचे हक्क या नवीन प्रकरणाचा समावेश करण्यात आलेला आहे. आणि त्याची माहिती गुन्हा दाखल करताना फिर्यादीला देणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशा प्रकरणांचा तपास दोन महिन्यांत पूर्ण करण्याची आणि खटला (ट्रायल) दोन महिन्यांत संपविण्याची कालमर्यादा ठरविण्यात आली आहे.

अ‍ॅट्रॉसिटी कायदा रद्द करावा अशी मागणी अलीकडे करण्यात येत आहे. ही मागणी निव्वळ राजकीय हेतूने करण्यात येत आहे. हा केंद्रीय कायदा आहे. तो राज्य सरकारला बदलता येणार नाही. लोकसभेने सुधारणा करताना सर्व विचार करून व सर्वांचे मत लक्षात घेऊनच त्यात बदल केलेला आहे.खैरलांजीसारखी माणुसकीला काळीमा फासणारी आणि सैतानालाही लाजवणारी संपूर्ण दलित कुटुंबाच्या हत्येची घटना आणि त्यात आठ लोकांना झालेल्या फाशीच्या शिक्षेनंतरही दलितांच्या हत्याकांडाच्या घटना कमी झालेल्या नाहीत. म्हणूनच तर कायद्यात सुधारणा करण्यात आली. या घटनेत अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट लागत असतानाही योग्य तऱ्हेने पोलीस तपास झाला नाही आणि न्यायालयापुढे तसे मांडले गेले नाही. त्यामुळे या खटल्यात हा कायदा लागत नाही, असा निकाल दिला गेला.

अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा(अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट १९८९)

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींवरील जातीय अत्याचाराला प्रतिबंध करणारा हा कायदा आहे. पुढील कृत्ये या कायद्याने गुन्हा ठरविली गेली आहेत..

- अनुसूचित जाती व जमातीच्या व्यक्तीला योग्य वा अयोग्य पदार्थ खाण्याची व पिण्याची सक्ती करणे.
- जातीय भावनेतून शारीरिक इजा करणे, त्रास देणे, अपमान करणे.
- नग्न धिंड काढणे, मानवी अप्रतिष्ठा करणे.
- जमिनीचा गैरप्रकारे उपभोग घेणे.
- स्वतच्या मालकीच्या जमीन व पाणीवापरात अडथळा निर्माण करणे.
- वेठबिगारी करण्यास सक्ती करणे.
- धाक दाखवून मतदान करण्यास भाग पाडणे.
- अनुसूचित जाती व जमातींच्या व्यक्तीच्या विरोधात खोटे गुन्हे दाखल करणे.
- लोकसेवकास खोटी माहिती पुरविणे.
- सार्वजनिक ठिकाणी अपमान करणे.
- प्रार्थनास्थळे, नदी, विहिरी, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारणे.
- प्रार्थनास्थळ अथवा घरास आग लावणे.
- पिण्याचे पाणी दूषित किंवा घाण करणे.
- महिलांचा विनयभंग करणे.
- महिलांचा लैंगिक छळ करणे.
- घर किंवा गाव सोडून जाण्यास भाग पाडणे.
- खोटी साक्ष वा पुरावा देणे.
- पुरावा नाहीसा करणे.
- लोकसेवकाने कोणताही अपराध करणे.

या कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी राज्य सरकार व पोलिसांची आहे. त्यासाठी पुढील गोष्टी त्यांनी करणे अनिवार्य ठरवले गेले आहे.

- राज्यस्तरावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती स्थापन करणे.
- दक्षता समितीने वर्षांतून दोनदा बैठका घेऊन जातीय अत्याचारांच्या प्रकरणांचा आढावा घेणे.
- जातीय अत्याचारांचे खटले चालवणाऱ्या विशेष सरकारी वकिलाच्या कामगिरीचा दर तीन महिन्यांनी आढावा घेणे.
- राज्यातील जातीय अत्याचार व त्यास प्रतिबंध करण्यासाठी करण्यात आलेल्या कारवाईचा प्रत्येक वर्षांच्या ३१ मार्चपर्यंत केंद्र सरकारला अहवाल सादर करणे.
- जातीय अत्याचारांचे खटले चालविण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करणे.
- विशेष सरकारी वकिलाची नेमणूक करणे.
- सामूहिक दंड आकारण्याचा राज्य सरकारला अधिकार.
- जातीय अत्याचार घडलेल्या किंवा घडण्याची शक्यता असलेल्या भागातील किंवा गावातील शस्त्रास्त्रांचे परवाने रद्द करणे.
- अनुसूचित जाती व जमातीच्या व्यक्तींना स्वसंरक्षणासाठी शस्त्रास्त्रांचे परवाने देणे.
- अटकपूर्व जामीन नाकारणे.
- पीडित व्यक्तीला किंवा कुटुंबाला आर्थिक मदत देणे व त्यांचे योग्य पुनर्वसन करणे.
- जातीय अत्याचाराचा विभाग घोषित करणे.

या कायद्याचा गैरवापर काही प्रमाणात होतोपरंतु मोठ्या प्रमाणावर याचा गैरवापर सवर्ण पुढारी त्यांच्या स्वार्थासाठी तसेच आपले वर्चस्व कायम राखण्यासाठी करतात. त्यासाठी बहुतांश वेळा गरीब व आश्रित दलित किंवा आदिवासींचा वापर करण्यात येतो.कोणत्याही कायद्याचा गैरवापर होऊ नये याची प्राथमिक जबाबदारी पोलिसांची असते. बऱ्याचदा वरिष्ठांच्या तसेच राजकीय दबावामुळे पोलीस योग्य ती कारवाई करीत नाहीत.

पोलीस कसे असावेत याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने ‘कर्तारसिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब’ या खटल्यात परिच्छेद क्रमांक ३६३ मध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे :

‘‘आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यात पोलिसांची भूमिका फार महत्त्वाची आहे. समाजाचे संरक्षण करण्याकरिता चांगले नेतृत्व असलेल्या, उत्तम प्रशिक्षित आणि शिस्तबद्ध पोलिसांची गरज आहे. ज्यावर विश्वास ठेवता येईल अशा पोलीस दलाची आवश्यकता आहे. तेही गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यास तसेच गुन्हा घडलाच तर तो उघडकीस आणण्यास पुरेसे हवेत. पोलिसांचे वर्तनही योग्य असावे.’’

ॲट्रॉसिटी ॲक्टच्या संदर्भात पोलिसांचे वर्तन पाहिले असता असे आढळून येते की, बऱ्याचदा त्यांना वरिष्ठांकडून योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही. अपर पोलीस महासंचालक दर्जाचा अधिकारी नागरी हक्क संरक्षण विभागाचा प्रमुख असला तरी प्रभावीपणे काम करत नाही असे म्हणता येईल.फार कमी पोलीस अधिकाऱ्यांना हा कायदा समजतो. त्यांचा या कायद्याचा अभ्यास नाही आणि योग्यरीत्या त्याची अंमलबजावणी करण्याची इच्छाही नाही. एखादी केस खोटी आहे हे माहीत असले, आणि तसा पुरावा असला, तरी ते खटला न्यायालयात पाठवतात. शासनाने १२ मे २०१५ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार, संनियंत्रण समितीने शिफारस केलेले खटलेच न्यायालयात पाठवावे असे आदेश दिलेले आहेत. पण त्याची पूर्तता होत नाही.

काही जातीयवादी आणि अज्ञानी पोलीस अधिकारी या कायद्यासंबंधात असा अपप्रचार करतात की, कलम चारप्रमाणे कर्तव्यात कसूर केल्यास एक वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद असल्याने त्यांना भीती वाटते. म्हणून मग खोटय़ा केसेसमध्येही आरोपींना अटक करावी लागते व त्यांच्यावर दोषारोप दाखल करून त्यांना न्यायालयात पाठवावे लागते. हे धादांत खोटे आहे. बऱ्याच पोलीस अधिकाऱ्यांना हे कलम ‘अदखलपात्र’ आहे हे माहीत नाही. आजपर्यंत एकाही पोलीस अधिकाऱ्याला या कलमाखाली शिक्षा झालेली नाही. या कलमातदेखील सुधारणा करण्यात आली आहे आणि आता प्रशासकीय चौकशीनंतरच या प्रकरणी कारवाई करण्याची तरतूद आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना पुरेसे संरक्षण मिळाले आहे. कलम २२ प्रमाणे सद्भावनेने केलेल्या कृत्याकरिता त्यांना संपूर्ण संरक्षण आहे.या कायद्याखाली पोलिसांनी प्रतिबंधक कारवाई केल्याचे प्रकरण निदर्शनास येत नाही. तसेच सार्वजनिक दंड किंवा हत्यारे जप्त करण्यात आल्याचेही आढळत नाही.

या कायद्याचा गैरवापर होऊ नये याची प्राथमिक जबाबदारी पोलिसांची असली तरी नंतर सरकारी अभियोक्ता यांची ती जबाबदारी आहे. पण प्रत्यक्षात निरिक्षण असे आहे की, फारच थोडे अभियोक्ता प्रभावीपणे बाजू मांडतात. अधिसूचना (Rules) क्रमांक ५ प्रमाणे पीडिताच्या इच्छेनुसार चांगल्या वकिलाची नेमणूक करावी असे जरी निर्देश असले, तरी त्याचा वापर क्वचितच होतो.

या कायद्याची योग्यरीत्या अंमलबजावणी करण्याची संबंधितांची इच्छा दिसून येत नाही. सरकारी अभियोक्त्यांचीसुद्धा जबाबदारी आहे की त्यांनी संबंधित प्रकरणाचा तपास बरोबर केला गेला नसेल तर पोलिसांकडून तो करवून घ्यावा. प्रसंगी साक्षीदारांची फेरतपासणी करावी. पण सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी यासंदर्भात मार्गदर्शक सूचना देऊनही त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही.

पोलीस आणि अभियोक्ता यांच्यानंतर जबाबदारी येते ती न्यायालयांची. राजस्थानमधील भंवरीदेवीच्या केसमध्ये न्यायाधीशांनी असे म्हटले होते की, ‘उच्चवर्णीय लोक दलित स्त्रीवर बलात्कार करू शकत नाहीत.’ त्यावर फारच गदारोळ झाला होता. काही वेळा अगदी क्षुल्लक तांत्रिक मुद्द्यावर आरोपींना सोडून देण्यात येते. सर्वोच्च न्यायालयाने ‘कैलास व इतर विरुद्ध स्टेट ऑफ महाराष्ट्र’ या खटल्यामध्ये परिच्छेद दहामध्ये असे म्हटले आहे : ‘आम्हाला आश्चर्य वाटते की आरोपींची ॲट्रॉसिटी ॲक्टखालील शिक्षा तांत्रिक ((Hyper technical) कारणावरून रद्द करण्यात आली.’दुसऱ्या एका निवाड्यात पोलीस अधीक्षक आणि जिल्हा दंडाधिकारी यांच्यावर कसूर केल्याबद्दल खटले दाखल करण्यास सुचवले होते आणि त्याची प्रत उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना देण्यात आली होती. पण अत्यंत खेदाची बाब अशी की त्याची (सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची) अंमलबजावणी होताना दिसत नाही. न्यायालयाबद्दल अत्यंत आदर आहे आणि बहुतांश न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालनही करतात. पण जे करत नाहीत त्यांच्यावर त्वरित कारवाई होणे आवश्यक आहे.

ॲट्रॉसिटी ॲक्टखाली शिक्षा होण्याचे प्रमाण जेमतेम दोन ते तीन टक्के एवढेच आहे. त्याला ज्याप्रमाणे वरील तीन घटक जबाबदार आहेत, तसेच खोटी साक्ष देणारे लोक

आणि खरी साक्ष देण्यास पुढे न येणारे साक्षीदारदेखील तितकेच जबाबदार आहेत. अर्थात याला बरीच कारणे आहेत. त्यांचे प्रथम निराकरण करावे लागेल. त्यासाठी साक्षीदारांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे करावे लागेल.

यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाची मानसिकता आपल्याला बदलावी लागेल. समाजाच्या मानसिकतेत बदल झाला असला तरी तो अद्याप पुरेसा नाही. अजूनही त्यात सुधारणेस बराच वाव आहे. सत्ताधीश, वरिष्ठ पोलीस व प्रशासकीय अधिकारी, इतकेच नव्हे तर न्यायपालिकेच्याही जातीय मानसिकतेचा अनुभव येत आहे. पण आनंदाची गोष्ट म्हणजे ते केवळ अपवादस्वरूप. अगदीच नगण्य.

आपल्याला कायद्याच्या राज्याची अपेक्षा आणि निकड आहे. सत्यावर आधारित कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.

समस्या सूत्रण (Formulation of the Problem)

भारतीय समाज जातिव्यवस्थेच्या अधीन असल्याने येथे वर्ण व्यवस्था अधिक ताठरतेने कार्यरत असलेली दिसते. वर्ण - वर्ग संघर्षाच्या कारणाने जात व्यवस्था सर्वंकष व सक्षम होते. वंचित, शोषित, उपेक्षित, श्रमिक व कष्टकरी असलेल्या वर्गास प्रामुख्याने ज्यास पूर्व परंपरेने अस्पृश्य, अंतज्य, अवर्ण अथवा शूद्र या नावाने प्रचलितपणे ओळखले गेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात अस्पृश्य अर्थात डिप्रेस्ड क्लास या नावाने देखील या घटकास ओळखले गेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संघराज्य मध्ये कल्याणकारी राज्याची प्रस्थापना व्हावी यासाठी कायद्याचे राज्य भारतीय संविधान आधारित निर्माण करण्यात आले आहे. भारतीय संविधानाने अनुसूचित जाती व जमाती असा शब्द प्रयोग करून या घटकास संवैधानिक अधिष्ठान प्राप्त करून दिलेले आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम 17 नुसार अस्पृश्यतेचे निवारण करण्याची तरतूद करण्यात आलेली असली तरीसुद्धा वास्तविक स्वरूपात अस्पृश्यता निवारणाचे प्रत्यक्ष अनुपालन झाल्याचे सार्वत्रिक दिसत नाही. अनुसूचित जाती - जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अर्थात ॲट्रॉसिटी नुसार सामाजिक भेदभावापासून संरक्षण देण्यास हा कायदा यशस्वी झाला आहे किंवा नाही याचा प्रस्तुत संशोधनातून अभ्यास करण्यात येणार आहे.

या कायद्याची अंमलबजावणी करत असताना राजकीय, सामाजिक, प्रशासकीय विशेषतः पोलिस प्रशासनाचे घटक निगडित असतात. पीडित आणि अन्यायग्रस्त घटकांचे समुपदेशन करून सक्षम पणे खटला न्यायालयात पोलीस प्रशासनाकडून दाखल होत नाही त्यामुळेही या कायद्याअंतर्गत घडलेल्या गुन्ह्यात आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्य आहेका?. या कारणांचा अंमलबजावणीच्या दृष्टिकोनातून शोध घेणे आणि भविष्यात हा कायदा प्रभावी उपक्रम कारक पणे पाठवते मी राबवता यावा यासाठी शासन प्रशासनास सूचना शिफारशी करणे हादेखील प्रस्तुत संशोधनाचा हेतू आहे.

कायद्याची अंमलबजावणी करताना राजकीय, प्रशासकीय व न्यायालयीन प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी यांची जातीय मानसिकता अडथळा ठरते का? जिल्हा स्तरावर कार्यरत असलेल्या दक्षता समिती व त्यांचे सर्व सदस्य यांची भूमिका सकारात्मक असते का नाही याचादेखील प्रस्तुत संशोधनातून शोध घेण्यात येणार आहे? दुर्लक्षित आणि अस्पृश्य असलेल्या घटकास गाव पातळीवर बेदखल बहिष्कृतकरण्याची भीती असते म्हणून असे गुन्हे प्रकर्षाने नोंदवले जात नाहीत का? नोंदवल्या गेलेल्या गुन्ह्यात शिक्षेचे प्रमाण नगण्य असते त्यास नेमकी कोणती कारणे कारणीभूत असतात आणि त्यावर कोणत्या उपाययोजना असू शकतात या संशोधक भूमिकेतून प्रस्तुत संशोधन करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती (Scope of Research Subject)

जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन या घटकाधीन महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा व विदर्भ या दोन प्रशासकीय विभागातील हिंगोली व वाशिम असे दोन जिल्हे संशोधनासाठी व्यष्टी अध्ययन म्हणून निवडण्यात येणार आहेत. या जिल्ह्या अंतर्गत अनुसूचित जाती - जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणीतुलनात्मकरित्याअभ्यासण्यात येणार आहे. संशोधनासाठीचा 2011 ते 2020 असा कालखंड निश्चित करण्यात येणार आहे.

गृहितके (Hypothesis)

१ पोलीस प्रशासन व स्थानिक स्वशासनातील पदाधिकारी यांचा गुन्हा नोंद करताना हेतूपुरस्पर विलंब करण्याचा प्रयत्न असतो.

२ भारतीय संविधानाने अनुसूचित जाती जमाती या संवर्गाचे संरक्षण केलेले आहे.

३ अनुसूचित जाती- जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा1989 नुसार आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्य आहे.

४ राजकीय दबावातून या कायद्याअंतर्गत येणारी प्रकरणे न्यायालयाबाहेर तडजोडीने मिटवली जातात.

५ पोलीस प्रशासनाकडून फिर्याद दाखल करून घेताना प्रभावी व परिणामकारक कलमांची नोंद घेतली जात नाही सक्षम व व्यासंगी अभियोक्ता सरकार कडून दिला जात नाही.

उद्दिष्टे (Objectives)

१ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार महाराष्ट्रातील विशेषतः हिंगोली व वाशीम या जिल्ह्यातील गुन्ह्यांची स्थिती व कारणांचा शोध घेणे.

२ भारतीय संविधानाने अनुसूचित जाती जमाती या संवर्गासाठी केलेल्या संरक्षण विषयक तरतुदींचा शोध घेणे.

३ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यात राजकीय, प्रशासकीय व सामाजिक कार्यकर्त्यांचा वर्तनाचा शोध घेणे.

४ पीडित व अन्यायग्रस्त यांची फिर्याद नोंदवताना वास्तविक व सक्षम कलमांचा उपयोग पोलीस प्रशासनाकडून केला जातो हो किंवा नाही याचा शोध घेणे.

५ शासनाचा या कायद्याच्या अंमलबजावणीत असलेला परिणामकारक सहभाग आणि सरकारी अभियोक्ता यांच्या भूमिकांचा शोध घेणे.

तथ्य संकलन (Data Collection)

निर्धारित संशोधन विषयाला निष्कर्षा कडे घेऊन जाण्यासाठी तथ्य संकलन हे अनिवार्य आणि संशोधनाचा अविभाज्य घटक आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन सामग्रीचा उपयोग करण्यात येणार आहे.

प्राथमिक तथ्य संकलन (Primary Data Collection)

प्राथमिक तथ्य संकलन हे प्रश्नावली, अनुसूची, मुलाखत, निरीक्षण व सर्वेक्षण आधारे करण्यात येणार आहे. प्राथमिक स्वरूपातील तथ्य संकलन पीडित घटक आणि पोलीस प्रशासन असेच हिंगोली व वाशिम जिल्ह्यातील सरकारी अभियोक्ता यांच्या मुलाखती घेऊन करण्यात येणार आहे. सामाजिक व राजकीय कार्यकर्ते व पदाधिकारी जे प्रत्यक्ष अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत दाखल केलेल्या खटले शी संबंधित आहेत यांच्याकडूनही अनुसूचीच्या माध्यमातून मुलाखत घेऊन तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

दुय्यम तथ्य संकलन (Secondary Data Collection)

वर्तमान पत्र, क्रमिक पुस्तके आणि काही विषयानुषंगिकमासिकाद्वारेतथ्य संकलन करण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती (Research Methdology)

प्रस्तुत संशोधन विषयासाठी अन्वेषणात्मक, वर्णनात्मक, सर्वेक्षणात्मक, विश्लेषणात्मक आणि ऐतिहासिक संशोधन पद्धतीसह ग्रंथालय पद्धतीचा देखील उपयोग करण्यात येणार आहे **प्रकरण योजना**

१. भारतीय समाज व्यवस्था आणि ॲट्रॉसिटी कायद्याची पार्श्वभूमी

भारतातील समाजव्यवस्था आणि जात व्यवस्था अध्ययन व संशोधन करण्यात येणार आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधन पद्धती व साहित्याचे पुनरावलोकन याचे तपशीलवार विवेचन करण्यात येणार आहे.

२. अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 व भारतीय संविधान यातील तरतुदी

समाज विकासात अनुसूचित जाती-जमातींना सामावून न घेता त्यांना वंचित ठेवण्याचे प्रयोजन तथाकथित समाज व्यवस्थेकडून निरंतर करण्यात येत होते परंतु भारतीय संविधान आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 नुसार ज्या वैधानिक व संवैधानिक तरतुदी निश्चित करण्यात आलेल्या आहेत त्यांची विस्तृत चर्चा प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे

३. जिल्हा व पोलिस प्रशासनाची ॲट्रॉसिटी कायद्याच्या अंमलबजावणीतील भूमिका

पीडित आणि अन्यायग्रस्त असलेल्या वंचित घटकास सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेत सहभागी करून घेण्यासाठी जिल्हा व पोलिस प्रशासनाची मध्यवर्ती भूमिका असते. ही भूमिका प्रस्तुत पीडित आणि अन्यायग्रस्त कुटुंबाच्या संरक्षणापासून ते पुनर्वसनापर्यंत कायम राहते त्यामुळेच जिल्हा व पोलिस प्रशासनाची ॲट्रॉसिटी कायद्याच्या अंमलबजावणीतील भूमिका सविस्तरपणे विवेकी आणि तटस्थ दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधनातून शोधण्यात येणार आहे.

४. हिंगोली व वाशिम जिल्ह्यातील ॲट्रॉसिटी प्रकरणाचा तुलनात्मक अभ्यास

संशोधनविषयाची व्याप्ती हिंगोली व वाशिम जिल्हा अशी मर्यादित करण्यात आली आहे त्यामुळे प्रस्तुत तथ्य संकलनातून जे सत्य प्रश्नावली, अनुसूची, निरीक्षण, सर्वेक्षण व प्रत्यक्ष मुलाखती या माध्यमातून जे प्राप्त होईल त्याचा आलेख, तालिका व सांख्यिकी या आधारे तौलनिक विवेचन प्रस्तुत प्रकरणातून करण्यात येणार आहे.

५.सारांश व निष्कर्ष.

संदर्भ सूची

१ https://legislative.gov.in/sites/default/files/A1989-33_2.pdf

२ Kambale, N.D., Depressed Castes and their Struggle for Equality, Institute for Social and Economic Change, Bangalore. New Delhi: Ashish publishing House,1983.

३ Gaikwad, S.L, Protective Discrimination Policy and Social Change, New Delhi: Rawat Publications, 1999.

४ SukhadeoThorat, Human Rights of Dalits by Human Rights of Ex Untouchables in India by Human Rights violation of the Dalits

५ Dr B.R. Ambedkar ‘Untouchables’ and Caste system, Bombay Education Department, Government of Maharashtra, 1989, 1990.

६ Dr. B.R. Ambedkar Social Justice and Indian Constitution, Deep & Deep (1995)

७ Zelliot Eleanor (1996), From Untouchable to Dalit, PP. 187-96.

८ M.A. Britto Implementation of SC/ST (PoA) Act. 1989.

९ P.S. Krishnan Atrocities against Dalits: Retrospect and prospect combat law, Volume-8 Issues 5-6, 2009

१० Justice P.S. Narayana The Scheduled Castes and Scheduled Tribes (PoA) Act, 1989.

११ Keer, Dhananjay (1987), Dr. Ambedkar: Life and Mission, New Delhi. P.138, New Delhi Publications.

१२ https://www.esakal.com/sampadakiya/atrocity-police-responsibility-increased-260722

१३ Ambedkar. B.R. Annihilation of Caste with Reply to Mahatma Gandhi Ed. SamataPrakashan Publication, Nagapur, 3rd (2001).

१४ Ambedkar. B.R. The untouchables who were they and why they became, untouchables? KaushalayPraksha Publication, Aurangabad. (2003).

१५ Michael, S.M. (ed.). Dalits in Modern India: Vision and Values. New Delhi: Vistaar Publications, (1999).

१६ Narayana's P.S. The scheduled castes and scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989 & Rules, 1995 with protection of civil Rights Act, 1955. Gogia Law Publication. Hyderabad, 4th Edn.

१७ Rahman, Azizur. Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989 – A Critical Study', Criminal Law Journal, (1991).

१८ Sahoo Khali. Rural Development Scheduled Castes and Scheduled Tribes classical publishing company, (2005).

संशोधक
सिद्धार्थ दत्ता गोवंदे

मार्गदर्शक
प्रा.डॉ. श्यामसुंदर पंढरीनाथ वाघमारे
प्राध्यापक तथा लोकप्रशासन विभाग प्रमुख
शारदा महाविद्यालय परभणी